**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**गुरुवार दिनांक ०३ सप्टेंबर २०२६**

**ठळक बातम्या**

1. **पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि बेल्जियमचे पंतप्रधान बार्ट डी वेव्हर यांच्यात नवी दिल्ली इथं द्विपक्षीय चर्चा.**
2. **वाढती वीज बिलं आणि कोल वॉशरीच्या निविदांवरून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची राज्य सरकारवर टीका.**
3. **गडचिरोली जिल्ह्यातल्या सिरोंचा तालुक्यात आज पहाटे भूकंपाचे सौम्य धक्के.**
4. **ॲथलेटिक्स फेडरेशन ऑफ इंडियाद्वारा २० व्या आशियाई खेळांसाठी ७७ सदस्यीय भारतीय ॲथलेटिक्स संघाची घोषणा.**

**आणि**

5. **महिला क्रिकेटमध्ये टी-२० आशिया चषक स्पर्धेत आज भारताचा सामना हाँगकाँगविरुद्ध होणार.**

**आता सविस्तर बातम्या .......**

भारत-बेल्जीयम

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि बेल्जियमचे पंतप्रधान बार्ट डी वेव्हर यांच्यात आज नवी दिल्ली इथं द्विपक्षीय चर्चा झाली. दोन्ही नेत्यांनी यावेळी द्विपक्षीय संबंधांच्या विविध पैलूंवर, तसंच परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर चर्चा केली. यावेळी विविध क्षेत्रांमधल्या सामंजस्य करारांवर स्वाक्षरी झाली. संरक्षण सहकार्याबाबत इरादापत्र, तसंच नवीकरणीय ऊर्जा, सायबर गुन्हेगारी आणि राजनैतिक प्रशिक्षण या क्षेत्रांमधल्या सामंजस्य करारांचा यात समावेश आहे.

शिवराज सिंह चौहान

महिला बचत गटांना बँकांकडून कर्ज घेताना येणाऱ्या अडचणी दूर करण्याचं आश्वासन केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराजसिंग चौहान यांनी दिलं आहे. मुंबईत महिला बचत गटांच्या सदस्यांसोबत चर्चा केल्यानंतर ते बोलत होते. देशात ६ कोटी लखपती दीदी बनवण्याचं केंद्र सरकारचं उद्दिष्ट आहे. त्यातल्या साडे ३ कोटी पूर्ण झाल्या आहेत. उर्वरित लखपती दीदींचे लक्ष्य पूर्ण करण्यात येणारे अडथळे दूर करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचं ते म्हणाले.

नाना पटोले

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी महागाई, वाढती वीज बिले आणि कोल वॉशरीच्या टेंडरवरून राज्य सरकारवर आज नागपुरात  आयोजित पत्रकार परिषदेत टीका केली. डब्ल्यूसीएलकडे कोळसा उपलब्ध असतानाही मोठ्या प्रमाणात नव्याने टेंडर काढण्यात आल्याचा आरोप करत, हे टेंडर ८ सप्टेंबरपूर्वी रद्द न केल्यास आंदोलनाचा इशारा त्यांनी दिला. महाजेनकोने खासगी कंपन्यांकडून कोळसा खरेदी करण्याची गरज काय, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. नाशिकमधील पुरातन दत्त मंदिर हटविण्याच्या मुद्द्यावरूनही पटोले यांनी सरकारवर नाराजी व्यक्त केली.

गडचिरोली भूकंप

गडचिरोली जिल्ह्यातल्या सिरोंचा तालुक्यात आज पहाटे तीन पूर्णांक सहा रिश्टर स्केल इतक्या तीव्रतेचे भूकंपाचे धक्के जाणवले. भूकंपाची खोली सुमारे १० किलोमीटर असून, त्याचं केंद्र सिरोंचा तालुक्यातल्या राखीव वनक्षेत्र परिसरात असल्याची प्राथमिक माहिती आहे. या भूकंपाचे सौम्य धक्के अहेरी आणि नागेपल्ली परिसरातही जाणवली. भूकंपामुळे कोणतीही जीवित अथवा वित्तहानी झाली नाही अशी माहिती स्थानिक प्रशासनानं दिली आहे.

नेपाळ पूर

नेपाळमधल्या पुरात  मृत्यू झालेल्या भारतीय नागरिकांची ओळख पटवण्यासाठी DNA प्रोफाइल लिंकिंगची प्रक्रिया सुरू आहे. यासाठी संबंधित मृतांच्या नातेवाईकांनी

आज संबंधित न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळेत प्रत्यक्ष उपस्थित राहण्याचं आवाहन राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागानं केलं आहे. मुंबई, पुणे आणि नाशिक इथं डीएनए नमुना संकलन आणि संबंधित प्रक्रियेची व्यवस्था करण्यात आली आहे. नेपाळमधल्या पुरात आतापर्यंत एक हजार २०४ जणांचा मृत्यू, तर चार हजारांहून अधिक जण बेपत्ता असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

कांदा दर

बाजारात पुरेशा प्रमाणात अद्याप कांदा नसल्याने नाशिक जिल्ह्यातल्या बाजार समितीमध्ये कांद्याची आवक कमी होऊन कांद्याला पाच हजार ३३० इतका उच्चांकी दर मिळाला. गतवर्षीच्या तुलनेत कांद्याचे दर दुपटीने वाढले आहेत मात्र केंद्र सरकारने खरेदी केलेला कांदा बाजारात आणण्याच्या हालचाली सुरू केल्यानंतर कांदा बाजारात दर चार हजार २५० वरून थेट तीन हजार ८०० रुपयांपर्यंत खाली आले होते, मात्र काल जिल्ह्यातल्या बाजार समितीमध्ये पुन्हा हे दर वाढले आहेत.

प्रलंबित रेल्वे विकासकामे

मध्य रेल्वेच्या काल  झालेल्या नागपुरातील  बैठकीत खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी अमरावती मतदारसंघातील प्रलंबित रेल्वे विकासकामे आणि प्रवासी सुविधांचे प्रश्न मांडले. राजकमल चौकातील रेल्वे ओव्हर ब्रिजसह विविध अंडरपास आणि उड्डाणपुलांची कामे निर्धारित वेळेत पूर्ण करण्याची मागणी त्यांनी केली. शकुंतला एक्स्प्रेस सुरू करणे, अमरावती-मुंबई अंबा एक्स्प्रेस सीएसएमटीपर्यंत पूर्ववत करणे आणि पुणे-शेगाव वंदे भारत अमरावतीपर्यंत वाढविण्याची मागणीही त्यांनी केली. रेल्वे विकासकामांचा नियमित आढावा घेण्यासाठी दर महिन्याला बैठक घेण्याची सूचनाही बोंडे यांनी केली.

‘मिशन सुधार’

सार्वजनिक वितरण प्रणालीतील पात्र लाभार्थ्यांची छाननी करण्यासाठी सुरू असलेल्या ‘मिशन सुधार’ अभियानात अमरावती जिल्ह्यात ५८ हजार ६५० संशयित लाभार्थी आढळले आहेत. त्यापैकी १५ हजार ७४७ जणांची पडताळणी पूर्ण झाली असून, अपात्र

लाभार्थ्यांचा रेशनचा लाभ बंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे. विविध शासकीय डेटाबेसच्या आधारे दुबार, मृत, स्थलांतरित आणि दीर्घकाळ धान्य न उचलणाऱ्या लाभार्थ्यांची तपासणी केली जात आहे. अमरावती शहरात सर्वाधिक १९ हजार ४८८ संशयित लाभार्थी आढळले आहेत.

मनोज जरांगे

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेल्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी मराठा संघटनांनी राज्यात विविध जिल्ह्यांमधे आज बंद पुकारला आहे. नांदेड जिल्ह्यात नांदेड-नागपूर महामार्गावर मराठा आंदोलकांनी रास्ता रोको केल्यामुळे काही काळ वाहतूक ठप्प झाली.

बाल एनसीडी शिबिर

बालकांमधील असंसर्गजन्य आजारांचे लवकर निदान, तज्ज्ञांकडून क्लिनिकल मूल्यांकन आणि वेळेवर उपचार सुनिश्चित करण्यासाठी बालकातील असंसर्गजन्य आजार कार्यक्रमांतर्गत भंडारा येथील बाल एनसीडी क्लिनिकमध्ये विशेष बाल एनसीडी तपासणी आणि क्लिनिकल मूल्यांकन शिबिराचं आयोजन करण्यात आलं. युनिसेफ महाराष्ट्र आणि एम्स, नागपूर यांच्या सहकार्याने आयोजित या शिबिराचं उद्‌घाटन जिल्हाधिकारी सावन कुमार यांच्या हस्ते करण्यात आलं. ३१ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर या कालावधीत आयोजित एनसीडी सप्ताहाचा हा एक भाग

आहे.

पोषण आहार गुणवत्ता

महाराष्ट्र राज्य अन्न आयोगाने भंडारा जिल्ह्यामध्ये दिला जाणारा शालेय पोषण आहार, अंगणवाडीच्या माध्यमातून दिला जाणारा आहार आणि अन्न नागरी पुरवठा विभागामार्फत लाभार्थ्यांना मिळणाऱ्या शिध्याची पाहणी केली. यावेळी आयोगाने जिल्ह्यातल्या शाळांना भेट देऊन विद्यार्थ्यांना दिला जाणारा आहार अधिकाऱ्यांनी

स्वतः खाऊन गुणवत्ता तपासली. आयोगाला तपासणीदरम्यान दोन शाळांच्या स्वयंपाकघरात अस्वच्छता आढळल्याने संबधितांवर कारवाईचे आदेश दिले आहेत.

ॲथलेटिक्स संघाची घोषणा

ॲथलेटिक्स फेडरेशन ऑफ इंडियाने जपानमधील आयची-नागोया इथं होणाऱ्या २० व्या आशियाई खेळासाठी ७७ सदस्यीय भारतीय ॲथलेटिक्स संघाची घोषणा केली आहे. हे खेळ १९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर या खेळात आयोजित केले जात आहेत. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील कांस्यपदक विजेता भालाफेकपटू यशवीर सिंगचा, दुखापतग्रस्त नीरज चोप्राच्या जागी जपानमध्ये होणाऱ्या आशियाई खेळांसाठी संघात समावेश करण्यात आला आहे. लांब पल्ल्याचा धावपटू अभिषेक पाल याला कथित उत्तेजक द्रव्य सेवनाच्या उल्लंघनाबद्दल नाडा कडून नोटीस बजावण्यात आल्यानंतर संघातून वगळण्यात आले आहे. भारतीय ॲथलेटिक्स महासंघाने लुधियाना इथ आयोजित पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. ६ नवीन ॲथलिट्स संघात समाविष्ट करण्यात आले आहेत. हांगझोऊ आशियायी खेळातील १५ पदक विजेत्या खेळाडूंचा यात समावेश आहे. यापैकी अविनाश साबळे, तजिंदरपाल सिंग तूर, पारुल चौधरी, अन्नू राणी हे ४प्रमुख सुवर्णपदक विजेते आपले जेतेपद राखण्यासाठी मैदानात उतरतील.

महिला क्रिकेट

महिला क्रिकेटमध्ये टी-२० आशिया चषक स्पर्धेत आज भारताचा सामना हाँगकाँगविरुद्ध होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार हा सामना रात्री ८ वाजता सुरू होईल. भारताच्या संघानं गेल्या रविवारी थायलंडच्या संघावर ९४ धावांनी मात केली होती. आज जर भारताने हाँगकाँगचा पराभव केला, तर उपांत्य फेरीतलं भारताचं स्थान निश्चित होईल.

चायना मास्टर्स

चायना मास्टर्स सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेत पुरूषांच्या एकेरी प्रकारात भारताच्या किदांबी श्रीकांतने  कॅनडाच्या व्हिक्टर लाईचा २१-१८, २१-१९ असा सरळ गेममध्ये पराभव करत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. श्रीकांतचा पुढचा सामना हाँगकाँगच्या ली चेुक यिऊशी होणार आहे.

हवामान

पूर्व विदर्भातील नागपूर, भंडारा, गोंदीया  आणि गडचिरोली जिल्हयात आज जोरदार पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला असून, अमरावती जिल्हयात देखील मुसळधार पावसाची शक्यता आहे. याशिवाय विदर्भातील सर्व जिल्हयांमध्ये आज वादळी पर्जन्यमान राहण्याचा अंदाज नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवला आहे. उद्या गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्हयात वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. दरम्यान, नागपूर इथं आज सकाळपासून ढगाळ वातावरण असून अधून मधून पावसाच्या हलक्या सरी वर्षाव करत आहे.  आगामी काही तासात  भंडारा, नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा, यवतमाळ, अमरावती आणि वाशिम या जिल्हयांमध्ये तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे.

*****